# दक्षतेचा इशारा देणारी गोष्ट

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित

*गेल्या काही वर्षांमध्ये, श्रीगुरुमाईंनी आपल्याला त्या प्रेमाविषयी शिकवले आहे, जे आईचे आपल्या मुलावर असते, त्याचबरोबर त्या उत्तरदायित्वांविषयीदेखील शिकवले आहे जी या प्रेमाशी निगडीत असतात. या प्रेमासंबंधीच्या अनेक कथाही त्यांनी सांगितल्या आहेत. श्रीगुरुमाईंकडून सत्संगात ऐकलेली अशीच एक गोष्ट मी इथे प्रस्तुत करत आहे. मातृदिन२०२१च्या निमित्ताने सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटसाठी या गोष्टीचे मी पुनर्लेखन केले आहे.*

गावातील चौकात मंद प्रकाश पसरला होता, जसा प्रकाश सूर्य मावळतीस जाताना असतो तसा. चहूकडे शांतता पसरली होती—असेही म्हणता येऊ शकते की, ती शांतता भयप्रद होती, जणू काही वादळापूर्वीची शांतता. मंद-मंद पावले टाकत तो मनुष्य पुढे आला. त्याचे खांदे वाकलेले होते, जणूकाही शरीरातच धसले गेले होते. मोठमोठ्या साखळदंडानी जखडलेले त्याचे पाय एका वेळी फक्त काही इंचच पुढे सरकू शकत होते. प्रत्येक पावलागणिक त्याच्या पायांच्या आजुबाजूला धुळीचे लोट उठताना दिसत होते.

त्याचे हातदेखील बांधलेले होते आणि हातकड्यांना जोडलेल्या साखळीला त्याच्या उजव्या बाजूला उभ्या असलेल्या एका धडधाकट रुंद जबड्याच्या पहारेकऱ्याने घट्टपणे पकडून ठेवले होते. डावीकडे आणखी एक पहारेकरी होता आणि त्यामागे तिसरा, जो दृढतेने तयार होता त्याला कोपराने ढोसण्यासाठी किंवा लाथ मारण्यासाठी, जर त्याने पुढे सरकण्यास थोडा उशीर केला किंवा तो जर एकाच जागी जास्त वेळ रेंगाळला तर. त्या मनुष्याची दृष्टी खाली खडेमिश्रित वालुकामय जमिनीवर खिळलेली होती. आता त्याने नजर उचलून वर पाहिले. खूप गर्दी उसळली होती. येणाऱ्या लोकांच्या रांगा लागल्या होत्या आणि ते सर्वजण त्यालाच न्याहाळत होते. त्याला चांगल्या रीतीने पाहता यावे यासाठी त्यातील काहीजण माना उंचावून पाहात होते. तो मनुष्य त्यांच्या समोरून पुढे गेला—भावशून्य चेहरा, डोळ्यांमध्ये उदासीनता, सर्वकाही मुकाट्याने सोसणारा, जणू काही मरणाआधीच तो मेलेला असावा.

गर्दीतील लोक कुजबुज करू लागले. नियतीने कसा दिवस दाखवला आहे! साखळदंडांनी जखडलेला, पिंजारलेल्या केसांचा आणि धुळीने माखलेल्या चेहऱ्याचा हा *तोच* करिष्मा असणारा मनुष्य आहे का,

ज्याने त्यांच्याबरोबर इतकी वर्षे घालविली होती? तोच मनुष्य ज्याची सर्वजण वाहवा करत असत आणि ज्याच्यावर मोहितदेखील होत असत—तो मनुष्य जो त्याच्या लहानपणापासूनच सर्वांना आवडत असे. तो किती सुंदर, किती मनमोहक दिसायचा; त्याचे आचरण किती निर्मळ होते. आणि तो जेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील किंचित हास्ययुक्त खट्याळ मुद्रेने त्यांच्याकडे पाहत असे—आणि तेदेखील तेव्हा, जेव्हा त्यांना याच्याकडून कमीत कमी अपेक्षा असे—तेव्हा ते त्याची ओळख काढल्याविना, त्याची मदत केल्याविना, त्याच्यावर विश्वास ठेवल्याविना राहत नसत.

आकाशात सूर्य आता अस्ताकडे जात होता आणि तो मनुष्य आपले पाय रखडत पुढे सरकत होता. फाशीचा स्तंभ आता फार दूर नव्हता. तिथे उभ्या असलेल्या लोकांच्या आकृत्या एकमेकांत मिसळून धूसर दिसू लागल्या होत्या : हातात छडी घेतलेला तो मनुष्य, दातांमध्ये फट असलेला तो लहान मुलगा, भुऱ्या रंगाचे कुरळे केस आणि थरथरणारे ओठ असलेली ती महिला. . . .

लोखंडी साखळदंडांचा एकमेकांवर आदळण्याचा आवाज आला, कारण तो मनुष्य अचानक थांबला होता. आपल्या दृष्टीपासून खूप दूरवर कुठेतरी त्याला एक खोली दिसू लागली होती जिथे लुकलुकणाऱ्या मंद प्रकाशाचा एक दिवा जळत होता. तो त्या पहारेकऱ्यांकडे वळला जे त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहात होते.

“फासावर चढण्याआधी माझी एक शेवटची इच्छा आहे” तो मनुष्य अचानक मोठ्याने बोलला, मग थोडा वेळ थांबला आणि अधिक सावधपणे बोलू लागला. “या गर्दीमध्ये अशी एक व्यक्ती आहे जिला मला काही सांगायचे आहे. माझ्या या विनंतीचा तुम्ही कृपया स्वीकार कराल का?”

पहारेकरी एकमेकांकडे पाहू लागले. ते आपसामध्ये गुपचूपपणे बोलले आणि मग वळून त्यांनी त्या कैद्याकडे पाहिले आणि डोके हलवून रूक्षपणे होकार दिला.

“खूप उपकार झाले तुमचे.”

तो मनुष्य गर्दीत घुसला आणि त्या पाठोपाठ त्याचे ते पहारेकरी, ज्यांनी त्याचे साखळदंड घट्ट पकडून ठेवले होते. नव्या उर्जेने, वेगाने तो पुढे जातच राहिला, आणि थेट, भुऱ्या केसांच्या त्या महिलेच्या अगदी समोर जाऊन पोहोचला, अगदी थोड्या वेळापूर्वीच त्याची दृष्टादृष्ट या महिलेशी झाली होती.

जवळ जाताच त्याला दिसले की ती महिला रडते आहे. तिचे डोळे अश्रूंनी डबडबले होते आणि चेहऱ्यावर अश्रूंचे ओघळ दिसत होते. त्या महिलेसमोर उभ्या असणाऱ्या या माणसाचे डोके तिच्यापेक्षा

जवळजवळ एक फूट उंच होते. तिला काहीतरी सांगायचे होते पण हुंदक्यांव्यतिरिक्त इतर कुठलाही आवाज तिच्या मुखातून बाहेर पडला नाही.

तो मनुष्य अगदी हळूहळू तिच्या दिशेने झुकला. त्याच्या चेहऱ्याने त्या महिलेच्या गालाला जवळजवळ स्पर्श केलाच होता; क्षणभर असे वाटले की, जणू तो तिच्या गालाचे चुंबन घेणार आहे. परंतु पुन्हा त्या मनुष्याच्या चेहऱ्यावर एक विदृप हास्य झळकले, मग त्याने आपले तोंड उघडून दात दाखवले आणि —

*कच्च!*

आपले हात कानावर ठेवून ती स्त्री किंचाळली आणि झटकन मागे झाली; तिचा चेहरा रक्तबंबाळ झाला होता.

"क्-क्-का केलेस तू असे?" तिने विचारले. तिचा आवाज वेदनेने, भीतीने आणि अविश्वासाने रुद्ध झाला होता. "तू—तू माझ्या कानाचा लचका तोडलास!"

तो मनुष्य तिच्यासमोरच जमिनीवर थुंकला.

मग धमकीवजा आवाजात गुरकावत तो म्हणाला, "आई." घृणेमुळे त्याचा चेहरा वाकडा-तिकडा होत होता.

"आई," तो मनुष्य पुन्हा म्हणाला, "मला हे सांग की आज मला मारण्यासाठी का घेऊन जात आहेत?"

ती महिला, जी या मनुष्याची आई होती—लहान मुलांसारखी हुंदके देत रडू लागली; काय बोलावे हे तिला कळत नव्हते. रक्तबंबाळ झालेला आपला कान तिने पकडून ठेवला होता, तिच्या डोळ्यांमधून अश्रूंच्या धारा वाहत होत्या आणि दात कडकड आवाज करत होते.

"बोल, मला जास्त वेळ दिला जाणार नाही." तो मनुष्य त्याच कठोर आणि रूक्ष आवाजात म्हणाला.

"क्...कारण की," त्या स्त्रीने शेवटी अडखळत बोलण्यास सुरुवात केली, "ते म्हणत आहेत की तू लोकांकडे चोरी केलीस! माझ्या बाळा, हे लोक म्हणत आहेत की तू लोकांचे खून केलेस! माझा. . .माझा विश्वासच बसत नाही की हे खरे आहे, परंतु . . ." ती बोलताबोलता थांबली. तिच्या हातावरून रक्त ठिबकतच होते.

तो मनुष्य शांतपणे म्हणाला, "तुझा विश्वास बसत नाही? तुझा? असे जर असेल, तर आई, मी तुला आठवण करून देतो. गतकाळातील त्या दिवसांची आठवण कर जेव्हा मी काही वर्षांचाच होतो. तेव्हापासूनच याची सुरुवात झाली होती, होय ना? तेव्हापासूनच मला लोकांच्या वस्तू चोरण्याची सवय लागली होती."

"पण त्या लहानसहान वस्तू होत्या!" त्याची आई म्हणाली. "खेळणी आणि किरकोळ सामान. आणि त्यावेळी तू खूप लहान होतास, अगदी लहानसा मुलगा आणि किती गोडदेखील—आणि तू एखाद्याकडून काही घेतलेस जरी, तरी त्याला वाईट वाटत नसे."

"आणि जेव्हा मी थोडा मोठा झालो आणि शाळेत जायला लागलो होतो, तेव्हा काय झाले? आठवते का, मी कसा माझ्या वर्गमित्रांचे सामान घेऊन येऊ लागलो होतो? आठवते का, हा माझ्यासाठी जणू एक प्रकारचा खेळच झाला होता आणि मी चोऱ्या करत राहिलो, करतच राहिलो?"

"हो, पण —"

"आणि तेव्हा तू काय म्हणालीस?" त्या मनुष्याने विचारले. "तू हसून म्हणालीस की, मी किती चतुर आहे. तू म्हणालीस की मी तुझा लाडका, सगळ्यात चांगला मुलगा आहे आणि ते कोणीही बदलू शकत नाही."

"तू तर बस जगाला जाणण्याचा प्रयत्न करत होतास! तू स्वतःला व्यक्त करत होतास!" त्याची आई म्हणाली. "आणि तू तेव्हादेखील फार लहान होतास."

"आणि जेव्हा मी आणखी थोडा मोठा झालो आणि चोरी करण्यात खरोखर खूप पटाईत झालो आणि यामध्ये मला आणखीनच मजा येऊ लगली, तेव्हा? मी एखाद्या महिलेच्या गळ्यातील हार झटकन पळवत असे. एखाद्या गरीब बिचाऱ्या म्हाताऱ्या माणसाचा खिसा कापत असे. मी फसवणूक करून कोणाचेही पैसे गायब करत असे. आणि जेव्हा मला वाटत असे की ते माझा पाठलाग करतील, तेव्हा मला माहीत होते की काय करायचे. तेव्हा तू मला काय म्हणायचीस?"

"मला हे कळत नाही की, हे सर्व तू का करतो आहेस," त्याची आई अत्यंत निराशेने म्हणाली. "माहीत नाही तुला काय सिद्ध करायचे आहे. मी तुला नेहमी हेच सांगितले आहे की, मी तुझ्यावर किती प्रेम करते!"

"होय," तो मनुष्य असंतोषाने म्हणाला. "बरोबर बोलते आहेस तू. तेच तर तू मला नेहमी सांगत होतीस. मी मोठा होत असताना तू मला नेहमी हेच सांगत होतीस. *तू खूप चांगला आहेस. तू फार खास, फार विशेष आहेस. तू महान आहेस. तू विलक्षण आहेस. तू वाटेल ते जरी केलेस, तरी ही गोष्ट कधीच बदलणार नाही. तू माझा लाडका, अनमोल मुलगा आहेस. मी तुझ्यावर प्रेम करते, खूप प्रेम करते, खूप खूप प्रेम करते."*

गावातील चौकामध्ये त्या मनुष्याचा आवाज गरजला. जवळच्याच झाडावर बसलेले कावळे दचकून कर्कश आवाज करत फांद्यांवरून उडून गेले.

"आणि माहीत आहे तुला आई?" तो मनुष्य पुन्हा हळूच सांगू लागला. "मी तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवला! मी तुझ्या प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवत गेलो! मला सांग आई की, मी काहीही जरी केले, तरी तू रात्रंदिवस मला हेच जर सांगत गेलीस, तर मला हे कसे कळणार होते की, काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे?"

"तेव्हा आता रडू नकोस आई," तो मनुष्य म्हणाला. "हीच शय्या तू माझ्यासाठी तयार केली आहेस. तू माझ्यासाठी हीच नियती साकारली आहेस. तू केलेल्या प्रशंसा माझ्यासाठी अक्षरशः मृत्यू बनल्या आहेत. तेव्हा तू माझी स्तुतीच करत राहा. सांगत राहा मला की, मी जे काही करतो ते किती झकास आहे. सांगत राहा की, मी चुका करूच शकत नाही. दाखव मला तुझे ते प्रेम ज्याच्याविषयी तू बोलत असतेस."

आईकडे एक शेवटचा तुच्छतापूर्ण दृष्टिक्षेप टाकून तो मनुष्य फाशीच्या स्तंभावर चढला. सूर्य पूर्णपणे वितळून क्षितीजरेषेवर पसरला होता, जणू काही नारंगी लाली आकाशात झिरपत होती. लोक त्याची अवस्था पाहून थट्टा करत होते. गर्दीच्या त्या समुद्रात कुठूनतरी एक हलकासा हुंदका ऐकू आला.

© २०२१एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.